ISBN : 978-93-913-05-62-8

गो. सी. टोम्पे महाविद्यालय सार्वजनिक ट्रस्ट द्वारा संचालित
(रजि. नं. ई १८२)

## गो. सी. टोम्पे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

चांदूर बाजार, जि.अमरावती–४४४७०४ (महाराष्ट्र)
नॅक 'ब'++ श्रेणी अधिस्विकृत (CGPA-2.89)
आयोजित

# मराठी अर्थशास्त्र परिषद
## ४४ वे राष्ट्रीय अधिवेशन

दि. ११, १२ व १३ मार्च २०२२




# अर्थसुमती
## स्मरणिका

संपादक
डॉ. संजय ज. कोठारी

भारतीय सामाजिक विज्ञान संशोधन परिषद, नवी दिल्ली (ICSSR)

Scanned by PDF Scanner

# अर्थसुमती

## स्मरणिका

विशेषांक

ISBN No. : 978-93-913-05-62-8

**प्रकाशक**

स्थानिक कार्याध्यक्ष

प्राचार्य डॉ. राजेंद्र एस. रामटेके

गो.सी. टोम्पे कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,

चांदूर बाजार, जि. अमरावती.

**प्रकाशन**

**आधार पब्लिकेशन,** अमरावती

विराग गावंडे

मो.नं. ९५९५५६६०२७८

**मुखपृष्ठ**

प्रा. डॉ. संजय ज. कोठारी

मो.नं. ९१५८३६६४६५

**अक्षर जुळवणी**

शशीकांन्त ना. यावले

अमरावती

मो. ९०४९९७५०८७

- गो.सी. टोम्पे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चांदुर बाजार, जि. अमरावती ने आयोजित केलेल्या मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ४४ वे वार्षिक राष्ट्रीय अधिवेशनातील शोध लेखांच्या गोषवाऱ्यांचे संकलन
- प्रायोजक ICSSR
- या पुस्तकात व्यक्त केलेली मते त्या त्या लेखकांची आहेत. यास संस्था, महाविद्यालय, प्राचार्य, संपादक, कार्यकारी संपादक, प्रकाशक, मुद्रक सहमत असतीलच असे नाही.

Scanned by PDF Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| ४८ | अण्णाभाऊ साठे यांचे आर्थिक विचार | डॉ. रामेश्वर मा. भिसे<br>डॉ. प्राजक्ता वि. पोहरे | ४८ |
| ४९ | अण्णाभाऊ साठे यांचे आर्थिक विचार | डॉ. राजेंद्रकुमार रामराव गव्हाळे<br>डॉ. सचिन भाष्कर कुंभार | ४९ |
| ५० | अण्णाभाऊ साठे यांचे आर्थिक विचार | प्रा.डॉ. रावसाहेब पिराजी इंगळे | ५० |
| ५१ | अण्णभाऊ साठे यांच्या कृष्णाकाठच्या कथा या कथासंग्रहातील निवडक कथांमधील त्यांचे आर्थिक विचार | प्रा.डॉ. करमसिंग राजपूत | ५१ |
| ५२ | अण्णाभाऊ साठे यांचे आर्थिक विचार | प्रा.डॉ. अनिल जी. सोनवणे | ५२ |
| ५३ | आर्थिक विषमतेच्या परिणामांविषयी अण्णाभाऊ साठे यांचे विचार | डॉ. सिध्दार्थ हरिदास मेश्राम | ५३ |
| ५४ | अण्णाभाऊ साठे यांचे आर्थिक विचार | डॉ. विष्णु घुमटकर | ५४ |
| ५५ | अण्णाभाऊ साठे यांचे वास्तविक आर्थिक तत्वज्ञान विषयक विचार | डॉ. दत्ता उत्तमराव कुंटेवाड<br>डॉ. पलमटे माधव पांडुरंगराव | ५५ |
| ५६ | अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील अर्थ विचार | प्राचार्य डॉ. राजू कथ्थू शिंदे<br>श्री. कमलेश भिमराज विसपुते | ५६ |
| ५७ | अण्णाभाऊ साठे यांचे आर्थिक विचार | प्रा. डॉ. मनिषकुमार कायरकर | ५७ |
| ५८ | अण्णाभाऊ साठे यांचे आर्थिक विचार आणि २१ वे शतक | प्रा. संजय दादासाहेब ठिगळे | ५८ |
| ५९ | अण्णाभाऊ साठे यांचा जीवन प्रवास<br>जागतिकीकरणाच्या काळात आर्थिक अरिष्ठावर मात - एक अवलोकन | डॉ. संजय ज. कोठारी<br>डॉ. जयंत एम. बनसोड | ५९ |
| ६० | साहित्यरत्न कॉम्रेड अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील मार्क्सवादी व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा मागोवा | डॉ. प्रविण प्रकाश डांगे<br>डॉ. विजयकुमार आ. पाटील | ६० |

ISBN 978-93-913-05-62-8

# 'आर्थिक विषमतेच्या परिणामांविषयी अण्णाभाऊ साठे यांचे विचार'

डॉ. एस. ई. घुमटकर (1669)
स. प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
बलभीम महाविद्यालय, बीड.

## गोषवारा

भारतीय समाज व्यवस्थेची रचना विषमतावादी असून भारतात आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक, विभागीय विषमता खूप मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे भारतात दारिद्य अधिक आहे. या विषमतेमुळे खऱ्या अर्थाने देशातील जनतेला 1947 मध्ये स्वातंत्र्य मिळाले नाही असेही स्पष्ट मत अण्णाभाऊ साठे मांडतात. त्यांच्या विचारातून असे स्पष्ट होते की, विषमतेचे चटके येथील गरीब मागासवर्गीय जनतेला खूप मोठ्या प्रमाणात सहन करावे लागतात ते स्वातंत्र्यपूर्व काळातही होते आणि आजही आहेत. या विषमतेमुळेच भारतात लोकांमध्ये भुकमरी, बेरोजगारी, दारिद्य, कुपोषण, गुन्हेगारी अधिक प्रमाणात आहे. तसेच मालक वर्गाकडून कामगार वर्गाचे नेहमीच शोषण केले जाते आणि विषमतावादी व्यवस्था सातत्याने प्रस्थापित करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न प्रस्थापितांकडून केले जात असल्याची मांडणी केलेली आहे.

आर्थिक विषमतेच्या परिणामांविषयी अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचा अभ्यास करण्यात आलेला आहे. आजच्या काळातही त्यांचे विचार कसे लागू पडतात व व्यवस्थेमध्ये परिवर्तन घडवून आणण्यासाठी काय केले पाहिजे जेणेकरून देशाचा सर्वसमावेशक विकास होईल या दृष्टिकोनातून मांडलेल्या विचारांचा याठिकाणी अभ्यास करण्यात आलेला आहे देशाचा राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा दर जरी जास्त असला तरी दारिद्य, बेरोजगारी, भूकमरी, कुपोषणाचे प्रमाणही अधिक आहे. भारतात डॉ. सुरेश तेंडुलकर यांच्या अहवालानुसार, 2004-05 मध्ये 37.2 टक्के नागरिक दारिद्य रेषेखाली जीवन जगत होते. तर, रंगराजन समितीच्या अहवालानुसार 2011-12 मध्ये भारतात 29.5 टक्के नागरिक दारिद्य रेषेखाली होते.[1] 2019-20 च्या केंद्रीय अर्थसंकल्प भाषणात भारताच्या वित्तमंत्री श्रीमती निर्मला सीतारमण यांनी नमूद केल्याप्रमाणे भारतात एक-तृतीयांश पेक्षा अधिक बालके कुपोषित आहेत तसेच, जगातील कुपोषित बालकांमध्ये प्रति तिसरे बालक भारतीय आहे. म्हणजे, जगातील सर्वाधिक कुपोषित बालके भारतात राहतात.



Scanned by PDF Scanner